# सलगरवस्ती पोलीस ठाणे, सोलापूर शहर

रोटलमेंट फ्रि कॉलनी नंबर ३, सोलापूर- ४१३००३

दूरध्वनीक्र.०२१७-२७४४६६१,

**Email-** ps.salgarwasti.cpsol@mahapolice.gov.in


जा.क्र.सलगरवस्ती पो.ठाणे/२०२४ सोलापूर शहर, दिनांक :- 5/6/2025

## -: प्रेसनोट दिनांक - ०५/०६/२०२४ :-

**सलगरवस्ती पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी सराईत गुन्हेगारा कडुन कवठे ता.उ.सोलापूर जि. सोलापूर येथुन चोरीस गेलेल्या २,५०,०००/- रु.किंमतीच्या ट्रक्टरचा ०४ दिवसात शोध.**

दि.२९/०५/२०२४ रोजी तक्रारदार नामे पाडुरंग खंडु हरनावळे यांनी सलगरवस्ती पोलीस ठाणेस येवुन दिनांक २८/०५/२०२४ रोजी रात्री ११.०० ते दिनांक २९/०५/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वा दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने तक्रारदार यांचे ताब्यातील २,५०,०००/- रु एक लाल रंगाचा महिंद्र अर्जुन ६०५ कंपनिचा ट्रॅक्टर त्यांचा आरटिओ पासिंग क्र. MH १३ DT २००८ हा रतिकांत कृषी केद्रा समोर लावलेला ट्रॅक्टरचे लॉक कशाचे तरी लॉक काढुन फिर्यादीच्या संमती वाचुन मुददाम लबाडीने चोरुन नेले आहे. म्हणुन वगैरे मजकुरच्या तक्रारी वरुन गुन्हा नोंदवुन त्याअनुषंगाने तपासास सुरुवात केली.

गुन्हा दाखल होताच सलगरवस्ती पोलीसांनी तपासाची चक्रे फिरवुन संशयीत इसम, गावातील नागरीक यांचेकडे विचारपुस चालु करुन मिळालेल्या माहीतीच्या आधारे तपास करुन तसेच मिळालेल्या माहीतीवरुन तांत्रीक माहीती उपलब्ध करुन घेवुन त्याचे आधारे आरोपीचा शोध घेतला असता घटनास्थळावर आरोपी नामे १) विकी दशरथ गायकवाड याचा मोबाईल नंबर चे लोकशन मिळाल्याने त्यांनी घटनास्थळावरुन केलेल्या कॉलच्या आधारे माहिती घेतली असता घटनास्थळावर आरोपी विकी गायकवाडचे मित्र नामे २) अजय येशु जाधव व ३) अनिल नागेश गायकवयाड ४) राहुल (पाहिजे आरोपी) हे गुन्हा घडताना घटनास्थळावर असल्याने निष्पन्न झाले. त्यानंतर सदर आरोपींना ताब्यात घेतल्या नंतर त्यांनी नमुद ट्रॅक्टर चोरी केल्याचे सांगितले. तसेच सदर ट्रॅक्टरची विक्री करुन येणाऱ्या पैसेचे समान वाटप करायचे ठरवले होते.

चोरीस गेलेला ट्रक्टर हा आरोपीचे मित्र ५) सोमशेखर आमोगसिध्द लोहार रा. मु.पो.तडवळ, ता.अक्कलकोट जि. सोलापूर याचे गॅरेजमध्ये ट्रक्टर मध्ये बदल करुन विक्री करण्याच्या उददेशाने ठेवलेला होतो. सदरचा ट्रक्टर ओळखता येवु नये म्हणुन नंबर प्लेट व वरील टप सुध्दा काढुन टाकलेला होता. यातील आरोपी क्रमांक ०५) सोमशेखर लोहार हा त्यांचे मित्र ०६ सिध्दाराम शंक बनसोडे ०७. मयुर (पाहिजे आरोपी) यांना सदरचा ट्रक्टर हा चोरीचा आहे हे माहिती असताना सुध्दा सदरचा विक्री करुन येणारे उत्पंन्न सर्व १ ते ०७ सात आरोपी वाटुन घेणार होते असे तपासात निष्पंन्न झाले आहे.

वर नमुद आरोपी कडुन २,५०,०००/- रुपयेचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री एम. राजकुमार, पोलीस उप-आयुक्त (परि), विजय कबाडे, सहा पोलीस आयुक्त विभाग ०२, अजय परमार वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमाकांत शिंदे, पोलीस उप-निरीक्षक गोविंद पवार, पोहेकॉ/७६० बालाजी पोतदार, पोना/ अयाज बागलकोटे, पो.कॉ./अर्जुन गायकवाड पो.कॉ./९३१ अविनाश डिगोळे, पो.कॉ./१८८० बाबुराव क्षिरसागर, पो.कॉ./१८८४सागर गायकवाड, पो.कॉ./६७८ दिपक साळुंखे, पो.कॉ./१७९९ सागर बोरामणीकर, पो.कॉ./९३७जयभिम कांबळे यांनी बजावली.

पो.कॉ. चंगरपलु

(उमाकांत शिंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
सलगरवस्ती पो. ठा.,सोलापूर शहर

Scanned with CamScanner